श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद् भागवत रसिक कुटुंब

## नारायण कवच

### श्रीमद्भागवतमहापुराणम्

### षष्ठः(स्) स्कंधः

### ॥ अथाष्टमोऽध्यायः ॥

### राजोवाच

यया गुप्तः(स्) सहस्राक्षः(स्), सवाहान् रिपुसैनिकान्।

क्रीडन्निव विनिर्जित्य, त्रिलोक्या बुभुजे श्रियम्॥ 1 ॥

भगवं(म्)स्तन्ममाख्याहि, वर्म नारायणात्मकम्।

यथाऽऽततायिनः(श्) शत्रून्, येन गुप्तोऽजयन्मृधे॥ 2 ॥

**परीक्षिताने विचारले, भगवन!ज्याच्या संरक्षणाखाली इंद्राने शत्रूंच्या सैनिकांना खेळाप्रमाणे सहज जिंकून त्रैलोक्याच्या राजलक्ष्मी चा उपभोग घेतला ,ते नारायण कवच मला सांगावे . तसेच त्याने त्यापासून सुरक्षित होऊन रणभूमीवर आक्रमण करणाऱ्या शत्रूंवर कसा विजय मिळवला हेही सांगावे .**

### श्रीशुक उवाच

वृतः(फ्) पुरोहितस्त्वाष्ट्रो, महेन्द्रायानुपृच्छते।

नारायणाख्यं(वँ) वर्माह, तदिहैकमनाः(श्) शृणु॥ 3 ॥

**श्री शुकदेव म्हणाले- परिक्षिता! जेव्हा देवांनी विश्वरूपाची पुरोहित म्हणून नेमणूक केली, तेव्हा इंद्राने विचारल्यावरून विश्वरूपाने त्याला नारायण कवचाचा उपदेश केला . तो तू एकाग्रचिताने ऐक .**

## विश्वरूप उवाच

धौताङ्घ्रिपाणिराचम्य, सपवित्र उदङ्मुखः।

कृतस्वाङ्गकरन्यासो, मन्त्राभ्यां(वँ) वाग्यतः(श्) शुचिः॥ 4 ॥

नारायणमयं(वँ) वर्म, सन्नह्येद् भय आगते।

पादयोर्जानुनोरूर्वो-रुदरे हृद्यथोरसि॥ 5 ॥

मुखे शिरस्यानुपूर्व्या-दोङ्कारादीनि विन्यसेत्।

ॐ नमो नारायणायेति, विपर्ययमथापि वा॥ 6 ॥

**विश्वरूप म्हणाला- भीती उत्पन्न झाली असता नारायण कवच धारण करावे. त्याचा विधी असा- प्रथम हात पाय धुवून आचमन करावे, नंतर अनामिकेत दर्भाचे पवित्र धारण करून उत्तरे कडे तोंड करून बसावे. यानंतर कवचाचा जप होईपर्यंत मौन धारण करून पवित्र अंतकरणाने 'ओम् नमो नारायणाय' आणि 'ओम् नमो भगवते वासुदेवाय' या मंत्रांनी हृदयादि अंगन्यास व अंगुष्ठादि कर न्यास करावा. प्रथम 'ओम् नमो नारायणाय'या अष्टाक्षरी मंत्राच्या ओम् इत्यादी आठ अक्षरांचा क्रमशः पाय, गुडघे, मांड्या,पोट, हृदय, वक्षस्थळ,मुख आणि मस्तक येथे न्यास करावा. किंवा पूर्वोक्त मंत्रांच्या मकारापासून सुरुवात करून ओंकारापर्यंत आठ अक्षरांचा मस्तकापासून आरंभकरून त्याच आठ अंगावर उलट क्रमाने न्यास करावा .**

करन्यासं(न्) ततः(ख्) कुर्याद्, द्वादशाक्षरविद्यया।

प्रणवादियकारान्त-मङ्गुल्यङ्गुष्ठपर्वसु॥ 7 ॥

**त्यानंतर 'ओम् नमो भगवते वासुदेवाय' याद्वाद शाक्षर मंत्राच्या ओम् इत्यादी 12अक्षरांचा उजव्या तर्जनी पासून डाव्या तर्जनी पर्यंत दोन्ही हातांची आठ बोटे आणि दोन्ही अंगठ्याच्या दोन दोन गाठीं मध्ये न्यास करावा .**

न्यसेद्धृदय ओङ्कारं(वँ), विकारमनु मूर्धनि।

षकारं (न्) तु भ्रुवोर्मध्ये, णकारं(म्) शिखया दिशेत्॥ 8 ॥

वेकारं(न्) नेत्रयोर्युञ्ज्यान्-नकारं(म्) सर्वसन्धिषु।

मकारमस्त्रमुद्दि*श्य, मन्त्रमूर्तिर्भवेद् बुधः॥ 9 ॥

सविसर्गं(म्) फड*न्तं(न्) तत्, सर्वदि*क्षु विनिर्दिशेत्।

ॐ वि*ष्णवे नम इति॥ 10 ॥

नंतर'ओम् विष्णवे नमः' या मंत्राचे पहिले अक्षर ओम् याचा हृदयावर, वी चा ब्रह्मरंध्रावर, ष् चा भुवयांवर, ण चा शेंडीवर,वे चा दोन्ही डोळ्यांच्या ठिकाणी आणि न चा शरीरातील सर्व गाठींचे ठिकाणी न्यास करावा.तदनंतर'ओम् अस्त्राय फट्' म्हणून दिग्बंध करावा. अशा प्रकारे न्यास करणारा पुरुष मंत्र स्वरूप होतो .

आत्मानं(म्) परमं(न्) ध्यायेद्, ध्येयं(म्) ष*ट्श*क्तिभिर्युतम्।

वि*द्यातेज*स्तपोमूर्ति-मिमं(म्) मन्त्रमुदाहरेत्॥ 11 ॥

यानंतर सर्व ऐश्वर्य, धर्म, यश, लक्ष्मी, ज्ञान आणि वैराग्या ने परिपूर्ण अशा इष्ट देव भगवंतांचे ध्यान करावे व आपणहीतद्रूप आहोत असे चिंतन करावे. त्यानंतर विद्या, तेज आणि तपःस्वरूप या कवचाचा पाठ करावा.

ॐ हरिर्विद*ध्यान्मम सर्वर*क्षां(न्),

न्य*स्ताङ्घ्रिप*द्मः(फ्) पतगेन्द्रपृ*ष्ठे।

दरारिचर्मासिगदेषुचाप-

पाशान् दधानोऽष्टगुणोऽष्टबाहुः॥ 12 ॥

ज्यांनी गरुडाच्या पाठीवर आपले चरण कमल ठेवले आहेत, आणिमादि आठ सिद्धी ज्यांची सेवा करीत आहेत, ज्यांच्या आठ हातांमध्ये शंख, चक्र, ढाल, तलवार, गदा, बाण, धनुष्य आणि पाश आहेत, ते श्रीहरी सर्व प्रकारे व सर्व बाजूंनी माझे रक्षण करोत .

जलेषु मां(म्) र*क्षतु मत्स्यमूर्तिर्-

यादोगणेभ्यो वरुण*स्य पाशात्।

स्थलेषु मायावटुवामनोऽव्यात्,

त्रिवि*क्रमः(ख्) खेऽवतु वि*श्वरूपः ॥ 13 ॥

मत्स्या अवतारी भगवान पाण्यामध्ये पाण्यातील जंतूंपासून आणि वरुणाच्या पाशापासून माझे रक्षण करोत.मायेने ब्रह्मचार्याचे रूप धारण करणारे वामनावतार जमिनीवर आणि विश्वरूप श्री त्रिविक्रम आकाशात माझे रक्षण करोत .

दुर्गेष्वटव्याजिमुखादिषु प्रभुः(फ्),

पायान्नृसिं(म्)होऽसुरयूथपारिः।

विमुञ्चतो यस्य महाट्टहासं(न्),

दिशो विनेदुर्न्यपतं(म्)श्च गर्भाः ॥ 14 ॥

ज्यांच्या भीषण डरकाळी ने सर्व दिशा दुमदुमून गेल्या होत्या आणि गर्भवतींचे गर्भ गळून पडले होते, ते दैत्य राजाचे शत्रू भगवान नृसिंह किल्ले, जंगल, रणभूमी इत्यादी बिकट ठिकाणी माझे रक्षण करोत .

रक्षत्वसौ माध्वनि यज्ञकल्पः(स्),

स्वदं(म्)ष्ट्रयोन्नीतधरो वराहः।

रामोऽद्रिकूटेष्वथ विप्रवासे,

सलक्ष्मणोऽव्याद् भरताग्रजोऽस्मान् ॥ 15 ॥

आपल्या दाढेने पृथ्वी धारण करणारे यज्ञमूर्ति वराह अवतार मार्गामध्ये, परशुराम पर्वतांच्या शिखरांवर आणि लक्ष्मणासह भरताचे थोरले भाऊ भगवान रामचंद्र प्रवासाचे वेळी माझे रक्षण करोत .

मामुग्रधर्मादखिलात् प्रमादान्-

नारायणः(फ्) पातु नरश्च हासात्।

दत्तस्त्वयोगादथ योगनाथः(फ्),

पायाद् गुणेशः(ख्) कपिलः(ख्) कर्मबन्धात् ॥ 16 ॥

भगवान नारायण जारण मारण इत्यादी अभिचारीक कर्मांपासून आणि सर्व प्रकारच्या अपघातांपासून माझे रक्षण करोत. ऋषी श्रेष्ठ नर गर्वापासून,योगेश्वर भगवान दत्तात्रेय योगातील विघ्नांपासून आणि त्रिगुणाधिपती कपिल कर्मबंधनांपासून माझे रक्षण करोत .

## सनत्कुमारोऽवतु कामदेवाद्-

## धयशीर्षा मां(म्) पथि देवहेलनात्।

## देवर्षिवर्यः(फ्) पुरुषार्चनान्तरात् ,

## कूर्मो हरिर्मां(न्) निरयादशेषात् ॥ 17 ॥

सनत्कुमार कामदेवापासून, हयग्रीव रस्त्याने चालतेवेळी घडणाऱ्या देव मूर्तींना नमस्कार इत्यादी न करण्याच्या अपराधा पासून, देवर्षी नारद ईश्वरसेवेच्या अपराधांपासून आणि कच्छपावतार सर्व प्रकारच्या नरकांपासून माझे रक्षण करोत .

## धन्वन्तरिर्भगवान् पात्वपथ्याद्,

## द्वन्द्वाद् भयादृषभो निर्जितात्मा।

## यज्ञश्च लोकादवताज्जनान्ताद्,

## बलो गणात् क्रोधवशादहीन्द्रः ॥ 18 ॥

भगवान धन्वंतरि कुपथ्या पासून, जितेंद्रिय ऋषभदेव सुखदुःखादि भीतीदायक द्वंद्वांपासून, यज्ञ भगवान लोका पवादापा सून,बलराम मनुष्य निर्मित कष्टांपासून आणि श्रीशेष क्रोध वश नावाच्या सापांच्या समूहापासून माझे रक्षण करोत .

## द्वैपायनो भगवानप्रबोधाद्,

## बुद्धस्तु पाखण्डगणात् प्रमादात्।

## कल्किः(ख्) कलेः(ख्) कालमलात् प्रपातु,

## धर्मावनायोरुकृतावतारः ॥ 19 ॥

भगवान व्यास अज्ञानापासून, बुद्धदेव नास्तिकांपासून आणि प्रमादा पासून माझे रक्षण करोत. धर्म रक्षणा साठी महान अवतार धारण करणारे भगवान कल्की कळी काळाच्या दोषांपासून माझे रक्षण करोत .

## मां(ङ्) केशवो गदया प्रातरव्याद्,

## गोविन्द आसङ्गवमात्तवेणुः।

नारायणः(फ्) प्राह्ण उदात्तशक्तिर्-

मध्यन्दिने विष्णुररीन्द्रपाणिः ॥ 20 ॥

**गदाधारी केशव प्रातःकाळी, बंसीधर गोविंद सकाळी, नारायण दुपारच्या आधी आणि मध्यांन्ही चक्रराज सुदर्शनाधारी विष्णू माझे रक्षण करोत .**

देवोऽपराह्णे मधुहोग्रधन्वा,

सायं(न्) त्रिधामावतु माधवो माम्।

दोषे हृषीकेश उतार्धरात्रे,

निशीथ एकोऽवतु पद्मनाभः ॥ 21 ॥

**तिसऱ्या प्रहरी प्रचंड धनुष्यधारी मधुसूदन आणि संध्या काळी ब्रह्मादि त्रिमूर्ती धारी माधव माझे रक्षण करोत.सूर्यास्तानंतर ऋषिकेश,मध्यरात्रीच्या अगोदर आणि मध्यरात्री एकटे भगवान पद्मनाभ माझे रक्षण करोत.**

श्रीवत्सधामापररात्र ईशः(फ्),

प्रत्यूष ईशोऽसिधरो जनार्दनः।

दामोदरोऽव्यादनुसन्ध्यं(म्) प्रभाते,

विश्वेश्वरो भगवान् कालमूर्तिः ॥ 22 ॥

**मध्यरात्रीनंतर श्रीवत्सलाञ्छन श्रीहरी, उषःकाळी खड्गधारी भगवान जनार्दन, सूर्योदयाच्या पूर्वी श्रीदामोदर आणि दोन्ही संध्या समयी कालमूर्ति भगवान विश्वेश्वर माझे रक्षण करोत .**

चक्रं(यँ) युगान्तानलतिग्मनेमि,

भ्रमत् समन्ताद् भगवत्प्रयुक्तम्।

दन्दग्धि दन्दग्ध्यरिसैन्यमाशु ,

कक्षं(यँ) यथा वातसखो हुताशः ॥ 23 ॥

हे सुदर्शना! तुझ्या कडांची टोके प्रलयकालीन अग्निसमान तीव्र आहेत. तू भगवंतांच्या प्रेरणेने सगळीकडे फिरत असतोस. आग ज्याप्रमाणे वाऱ्याच्या साह्याने गवत वगैरे जाळून टाकते त्याप्रमाणे तू आमच्या शत्रूसेनेला लगेच जाळून टाक .

**गदेऽशनिस्पर्शनविस्फुलिङ्गे,**

**निष्पिण्ढि निष्पिण्ढ्यजितप्रियासि।**

**कूष्माण्डवैनायकयक्षरक्षो-**

**भूतग्रहां(म्)श्चूर्णय चूर्णयारीन् ॥ 24 ॥**

हे कौमोदकी गदे! तुझ्यापासून निघणाऱ्या ठिणग्यांचा स्पर्श वज्राप्रमाणे असह्य आहे. तू भगवंतांची आवडती आहेस. तू कुष्मांड, विनायक, यक्ष, राक्षस, भूत, प्रेत इत्यादीकांचा चुरा करून टाक आणि माझ्या शत्रूंचा नायनाट कर .

**त्वं(यँ) यातुधानप्रमथप्रेतमातृ-**

**पिशाचविप्रग्रहघोरदृष्टीन्।**

**दरेन्द्र विद्रावय कृष्णपूरितो,**

**भीमस्वनोऽरेर्हृदयानि कम्पयन् ॥ 25 ॥**

हे शंख श्रेष्ठा! भगवान श्रीकृष्णांनी फुंकल्यानंतर तू भयंकर आवाज करून माझ्या शत्रूंच्या हृदयाचा थरकाप उडव, तसेच यातुधान, प्रमथ, प्रेत, मातृका, पिशाच्च, ब्रह्मराक्षस इत्यादी भयानक प्राण्यांना येथून पळवून लाव .

**त्वं(न्) तिग्मधारासिवरारिसैन्य-**

**मीशप्रयुक्तो मम छिन्धि छिन्धि।**

**चक्षूं(म्)षि चर्मञ्छतचन्द्र छादय,**

**द्विषामघोनां(म्) हर पापचक्षुषाम् ॥ 26 ॥**

हे तीक्ष्ण धारेच्या श्रेष्ठ तलवारी! तू भगवंतांच्या प्रेरणेने माझ्या शत्रूंना छिन्नविछिन्न करून टाक. शेकडो चंद्रांप्रमाणे फिरणाऱ्या हे ढाली, माझ्या शत्रूंचे डोळे तू बंद कर आणि पापी नजर असणाऱ्यांची दृष्टी नाहीशी कर .

यन्नो भयं(ङ्) ग्रहेभ्योऽभूत्, केतुभ्यो नृभ्य एव च।

सरीसृपेभ्यो दं(म्)ष्ट्रिभ्यो, भूतेभ्यों(म्)ऽहोभ्य एव वा ॥ 27 ॥

सर्वाण्येतानि भगवन्-नामरूपास्त्रकीर्तनात्।

प्रयान्तु सं(ङ्)क्षयं(म्) सद्यो, ये नः(श्) श्रेयः(फ्) प्रतीपकाः ॥ 28 ॥

सूर्यादि ग्रह,धूमकेतु, दुष्ट माणसे, साप, दाढा असणारे हिस्त्र पशु, भूत, प्रेत इत्यादी तसेच पापी प्राण्यांपासून आम्हाला जे जे भय निर्माण होईल आणि जे जे आमच्या हिताच्या विरोधी असतील, ते सर्वजण भगवंतांचे नाम, रूप तसेच आयुधांचे कीर्तन केल्यावर नष्ट होवोत .

गरुडो भगवान् स्तोत्रस्- तोभश्छन्दोमयः(फ्) प्रभुः।

रक्षत्वशेषकृच्छ्रेभ्यो, विष्वक्सेनः(स्) स्वनामभिः ॥ 29 ॥

बृहद्,  रथन्तर इत्यादी सामवेदीय स्तोत्रांनी ज्याची स्तुती केली जाते, तो वेदमूर्ती भगवान गरुड आणि विश्वकसेन आपल्या नामोच्चारणाच्या प्रभावाने आमचे सर्व तऱ्हेच्या संकटांपासून संरक्षण करोत .

सर्वापद्भ्यो हरेर्नाम- रूपयानायुधानि नः।

बुद्धीन्द्रियमनः(फ्) प्राणान्, पान्तु पार्षदभूषणाः ॥ 30 ॥

श्रीहरी चे नाम, रूप,वाहन,आयुधे आणि श्रेष्ठ पार्षद आमची बुद्धी, इंद्रिये, मन आणि प्राणांचे सर्व प्रकारच्या संकटांपासून रक्षण करोत .

यथा हि भगवानेव, वस्तुतः(स्) सदसच्च यत्।

सत्येनानेन नः(स्) सर्वे, यान्तु नाशमुपद्रवाः ॥ 31 ॥

जेवढे म्हणून कार्य कारण रूप जग आहे, ते वास्तविक भगवंत आहे, या सत्याच्या प्रभावाने आमचे सर्व उपद्रव नाहीसे होवोत.

यथैकात्म्यानुभावानां(वँ्), विकल्परहितः(स्) स्वयम्।

भूषणायुधलिङ्गाख्या, धत्ते शक्तीः(स्) स्वमायया ॥ 32 ॥

तेनैव सत्यमानेन, सर्वज्ञो भगवान् हरिः।

पातु सर्वैः(स्) स्वरूपैर्नः(स्), सदा सर्वत्र सर्वगः ॥ 33 ॥

ज्या लोकांनी ब्रह्म आणि आत्मा यांच्या एकतेचा अनुभव घेतला आहे, त्यांच्या दृष्टीने भगवंताचे स्वरूप भेद रहित आहे; तरीसुद्धा ते आपल्या मायेने अलंकार, आयुधे आणि रूप नावाच्या शक्ती धारण करतात, ही गोष्ट सत्य आहे. याच कारणाने सर्वज्ञ, सर्व व्यापक भगवान श्रीहरी नेहमीच सर्व स्वरूपात आमचे सर्वत्र रक्षण करोत .

विदिक्षु दिक्षूर्ध्वमधः(स्) समन्ता-

दन्तर्बहिर्भगवान् नारसिं(म्)हः।

प्रहापयँल्लोकभयं(म्) स्वनेन,

स्वतेजसा ग्रस्तसमस्ततेजाः ॥ 34 ॥

जे आपल्या शब्दाने सर्व लोकांची भीती दूर करतात आणि आपल्या तेजाने सर्वांचे तेज ग्रासून टाकतात, ते भगवान नृसिंह दिशोपदिशात, वर खाली, आत बाहेर अशा सर्व ठिकाणी आमचे रक्षण करोत .

मघवन्निदमाख्यातं(वँ्),

वर्म नारायणात्मकम्।

विजेष्यस्यञ्जसा येन,

दं(म्)शितोऽसुरयूथपान्॥ 35 ॥

इंद्रा! मी तुला हे नारायण कवच सांगित ले. हे कवच तू धारण कर, म्हणजे अनाया सेच सर्व दैत्य सेनापतींना जिंकून घेशील .

एतद् धारयमाणस्तु, यं(यँ्) यं(म्) पश्यति चक्षुषा।

पदा वा सं(म्)स्पृशेत् सद्यः(स्), साध्वसात् स विमुच्यते॥ 36 ॥

हे नारायण कवच धारण करणारा पुरुष ज्याला आपल्या डोळ्यांनी पाहतो किंवा पायाने स्पर्श करतो, तो ताबडतोब सर्व भयांपासून मुक्त होतो .

**न कुतश्चिद् भयं(न्) तस्य, विद्यां(न्) धारयतो भवेत्।**

**राजदस्युग्रहादिभ्यो, व्याघ्रादिभ्यश्च कर्हिचित्॥ 37 ॥**

जो ही वैष्णवी विद्या धारण करतो, त्याला राजा, चोर, पिशाच्च, वाघ इत्यादींपासून कोणत्याही प्रकारची भीती राहात नाही .

**इमां(वँ) विद्यां(म्) पुरा कश्चित्, कौशिको धारयन् द्विजः।**

**योगधारणया स्वाङ्गं(ञ्), जहौ स मरुधन्वनि॥ 38 ॥**

पूर्वी कौशिक गोत्रातील एका ब्राह्मणाने ही विद्या धारण करून, योगाने आपल्या शरीराचा मरूभूमि मध्ये त्याग केला होता .

**तस्योपरि विमानेन, गन्धर्वपतिरेकदा।**

**ययौ चित्ररथः(स्) स्त्रीभिर्-वृतो यत्र द्विजक्षयः॥ 39 ॥**

जेथे त्या ब्राह्मणाचे शरीर पडले होते, त्याच्यावरून एक दिवस गंधर्वराज चित्ररथ आपल्या स्त्रियांसह विमानात बसून चालला होता .

**गगनान्न्यपतत् सद्यः(स्), सविमानो ह्यवाक्शिराः।**

**स वालखिल्यवचना-दस्थीन्यादाय विस्मितः।**

**प्रास्य प्राचीसरस्वत्यां(म्), स्नात्वा धाम स्वमन्वगात्॥ 40 ॥**

तेथे येताच खाली डोके करून तो विमानासह आकाशातून पृथ्वीवर पडला. यामुळे आश्चर्यचकित झालेल्या त्याला, जेव्हा वालखिल्य मुनींनी सांगितले की हा नारायण कवच धारण केल्याचा परिणाम आहे, तेव्हा त्याने त्या ब्राह्मणाच्या अस्थि पूर्ववाहिनी सरस्वती नदीमध्ये सोडून दिल्या आणि पुन्हा स्नान करून तो आपल्या लोकी गेला .

## श्रीशुक उवाच

**य इदं(म्) शृणुयात् काले, यो धारयति चादृतः।**

**तं(न्) नमस्यन्ति भूतानि, मुच्यते सर्वतो भयात्॥ 41 ॥**

**श्री शुक म्हणतात, जो हे नारायण कवच योग्य वेळी ऐकून आदरपूर्वक धारण करतो, त्याच्या समोर सर्व प्राणी नम्र होतात आणि तो सर्व प्रकारच्या भयापासून मुक्त होतो .**

**एतां(वँ) विद्यामधिगतो, विश्वरूपाच्छतक्रतुः।**

**त्रैलोक्यलक्ष्मीं(म्) बुभुजे, विनिर्जित्य मृधेऽसुरान्॥ 42 ॥**

**विश्वरूपा पासून शतक्रतु इंद्राने ही वैष्णवी विद्या प्राप्त करून रणभूमीवर असूरांना जिंकले आणि तो त्रैलोक्य लक्ष्मीचा उपभोग घेऊ लागला .**

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(म्)**

**षष्ठस्कन्धे नारायणवर्मकथनं(न्) नामाष्टमोऽध्यायः॥**